# आव्हानाला सामोरे जाण्यासाठी तयार व्हा!

वार्ताहर
दोडामार्ग

जगातील पाणी, प्राणी, वनस्पती, सूक्ष्म जीव, वातावरण प्रदूषित झाले असून ते नष्ट होण्याच्या मार्गावर येऊन ठेपले आहे. त्यामुळे जग, जंगल व जमीन रक्षणासाठी आता शेवटची लढाई लढण्याची वेळ आली आहे. भविष्यात येणाऱ्या आव्हानाला सामोरे जाण्यासाठी युवकांनी तयार राहवे, असे आवाहन गोव्यातील पर्यावरण तज्ज्ञ प्रा. राजेंद्र केरकर यांनी केले. येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात निसर्गमंचाचे उद्घाटन करण्यात आले. त्यावेळी ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. यावेळी व्यासपिठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील, निसर्ग मंडळाचे प्रमुख डॉ. पी. डी. गाथाडे उपस्थित होते.

श्री. केरकर म्हणाले, जिल्ह्यात विशेषत: सावंतवाडी, दोडामार्ग तालुक्यात महाराष्ट्रातील शेवटचे जंगल होते, तेही नष्ट होत आले आहे. सिमेंटची जंगले वाढली आहेत. त्यामुळे वेगवेगळी रोगराई निर्माण होत आहे. दोडामार्ग तालुक्यात पूर्वी प्रत्येक गावात देवराई होती. वातावरणात गारवा आणि गोडवा होता. माणसाने हव्यासापोटी तेही नष्ट केले आहे. वेगवेगळ्या औषधी वनस्पती, फुले, वेली, फुलांच्या जाती, सूक्ष्म जमाती नष्ट झाल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

**दोडामार्ग महाविद्यालयात निसर्गमंचाचे उद्घाटन**

प्राचार्य डॉ. पाटील अध्यक्षस्थानावरून बोलताना म्हणाले, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी देवराया, कलासंस्कृती, येथील खाद्यपदार्थ, प्राणी व पक्षांचे अधिवास, फुलांच्या व पक्षांच्या जाती यांचे यावर्षीपासून सर्वेक्षण करण्यात येणार असून त्यांच्या रक्षणासाठी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमार्फत वेगवेगळे उपक्रम व चळवळी राबविण्यात येणार आहेत. त्यात विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन आपला तालुका समृद्ध करावा, असे आवाहन केले.प्रास्ताविक प्रा. डॉ. गाथाडे यांनी, सूत्रसंचालन भूषण सावंत यांनी, तर आभार वंदना पटकारे हिने मानले.

तरुण भारत - 7/2/14